# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### राज्यात गांव जिल्हा जल सुरक्षितता तसेच पंचवार्षिक चक्रिय आराखडा तयार न करताच राष्ट्रीय पेयजल कार्यक्रमाची अंमलबजावणी केल्याबाबत

**(१) ११११ (१५-०१-२०१५). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गांव जिल्हा जल सुरक्षितता आराखडा तसेच पंचवार्षिक चक्रिय आराखडा तयार न करताच केंद्र शासनाच्या राष्ट्रीय पेयजल कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात आली असल्याचे माहे नोव्हेंबर २०१४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वरील योजनेच्या कामाच्या आराखड्याच्या मंजुरीला विलंब झाल्यामुळे केंद्राकडून गेल्या वर्षी मिळणाऱ्या रक्कमेपैकी तब्बल ६४ कोटी रुपये मिळाले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वरील योजनेच्या कामाच्या आराखड्यास होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत व तो तातडीने पूर्ण करुन केंद्राकडे पाठविण्यात आला आहे काय,

(४) नसल्यास, याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. बबनराव लोणीकर (०२-०७-२०१६) :** (१) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम अंतर्गत राज्यातील सर्व गावांचे गावस्तरीय पेयजल सुरक्षा आराखडे व त्याआधारे जिल्हा पेयजल सुरक्षा आराखडे तयार करणेआवश्यक आहे. त्यानुसार प्रायोगिक तत्त्वावर अमरावती जिल्ह्यामध्ये मोर्शी तालुक्यातील मौजे डोमक व वरुड तालुक्यातील मौजे तिवसागड या गावांचे जलसुरक्षितता आराखडे तयार करुन मंजूर करण्यात आले आहेत.

याच धर्तीवर वरुड तालुक्यातील उर्वरित ९६ गावांचे जलसुरक्षितता आराखडे तयार करण्यात आले आहेत.

तथापि, सद्यःस्थितीत राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत पंचवार्षिक चक्रिय आराखडा तयार करण्याची पध्दत नसून वार्षिक आराखडा तयार करुन त्यानुसार अंमलबजावणी करण्यात येते.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अरुणावती प्रकल्पाच्या कामात झालेला गैरप्रकार**

**(२) २४५९५ (१७-०८-२०१५). श्री.मदन येरावार (यवतमाळ), श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यातील दारव्हा व दिग्रस शहराकरीता भारत निर्माण योजनेतून पाणीपुरवठ्या करीता अरुणावती प्रकल्पावर सहा ते सात कोटी खर्चुन योजना तयार करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उर्वरित कामाकरीता माहे फेब्रुवारी मध्ये पुन्हा एक कोटी देऊन अरुणावती प्रकल्पावर एक्सप्रेस फिडर बसविणे, लिकेजेस दुरुस्तीची कामे माहे मार्च किंवा एप्रिलपर्यंत पुर्ण होणे अपेक्षित असतांना सुचने नंतरही अधिका-यांनी कोणतीही कामे केली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रशासकीय अधिकारी व नगर पालिकेच्या गलथान कारभारामुळे दारव्हा व दिग्रस शहरातील नागरिकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रशासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१९-०७-२०१६) :** (१) हे अंशतः खरे आहे.

दारव्हा शहराकिरता सन २००९ मध्ये टंचाई अंतर्गत दि. १४.११.२००९ च्या शासन निर्णयान्वये रु. ६८१ लक्ष किंमतीच्या योजनेचा टंचाई अंतर्गत प्रशासकीय मान्यात देण्यात आली होती.

दिग्रस शहराकरिता महाराष्ट्र सुजल निर्मल अभियानांतर्गत दि. १६.०९.२००९ च्या शासन निर्णयान्वये रु. ३०३.२२ लक्ष किंमतीच्या योजनेला प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती.

(२) हे अंशतः खरे आहे.

दारव्हा शहराकरिता टंचाई अंतर्गत जिल्हाधिकारी, यवतमाळ यांचे दि. १५.०१.२०१५ चे आदेशानुसार रु. १२७.२८ लक्ष किंमतीच्या योजनेला मान्यता दिली होती. मंजूर योजनेतील लिकेज दुरुस्ती तसेच योजना सुधारणा व बळकटीकरणाची कामे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत पूर्ण करण्यात आली. परंतु एक्प्रेस फिडरचे काम महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीकडून पूर्ण ठेव तत्वावर करण्याचा निर्णय घेतल्याने सदर काम विहित वेळेत पूर्ण झाले नाही.

दिग्रस शहराकरिता कोणताही प्रस्ताव प्रस्तावित नव्हता.

(३) व (४) दारव्हा शहराकरिता एक्प्रेस फिडरचे काम विहित वेळेत पूर्ण न झाल्यामुळे अखंड विद्युत पुरवठ्या अभावी दारव्हा शहरात काही काळ पाणी टंचाई होती तथापि महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीला देण्यात आलेले एक्प्रेस फिडरचे काम पूर्ण झाले असून दारव्हा सुरळीत पाणी पुरवठा सुरु आहे.

दिग्रस शहरात पाणी टंचाई परिस्थिती उद्भवली नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील ३५०० वयोवृध्द कलावंत मानधना पासून वंचित राहिल्याबाबत.**

**(३) २९५२१ (२१-१२-२०१५). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अजित पवार (बारामती), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात जिल्हा समितीने सन २००९-१० ते २०१४-१५ या वर्षात पाठविलेल्या ३५११ वयोवृध्द कलावंतांचे मान्य केलेले सर्व प्रस्ताव सांस्कृतिक कार्य विभागाने ६ कोटी ४२ लाख रुपयांचा पुरवणी मागण्यांचा प्रस्ताव वित्त विभागास सादर न केल्यामुळे राज्यातील ३५०० वयोवृध्द कलावंतांना मानधनापासून वंचित राहावे लागले, हे खरे आहे काय,

(२) तसेच सोलापूर जिल्ह्यातील ८७१ व हिंगोली जिल्ह्यातील १२० वृध्द साहित्यिक व कलावंतांना अद्यापही मानधन मिळाले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कलावंतांची निवड करण्यासाठी जिल्हा स्तरावर, समित्यांची नियुक्ती न केल्यामुळे हजारो प्रकरणे मान्यतेसाठी प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार याप्रकरणी जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) तसेच वृध्द कलावंतांना त्यांचे त्वरित मानधन देण्याबाबत व मानधनात वाढ करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१३-०७-२०१६) :** (१) हे खरे नाही. सन २०१५ च्या हिवाळी अधिवेशनात नव्याने पात्र कलावंतासाठी पुरक मागणीद्वारे निधी उपलब्ध करुन घेण्यात आला आहे.

(२) हे खरे नाही, सोलापूर जिल्ह्याच्या ८७१ कलावंताना, तसेच हिंगोली जिल्ह्यातील ११९ कलावंतांनाही तरतूद वितरीत करण्यात आली आहे.

(३) हे खरे नाही. मानधनाकरिता कलांवत निवडीबाबतच्या २० जिल्ह्यात समित्या गठीत झालेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) कलावंतांना त्वरीत मानधन मिळण्यासाठी ऑनलाईन मानधन देण्याची प्रक्रिया टप्प्याटप्प्याने सर्व जिल्ह्यात लागू करण्यात येत आहे.

दिनांक २२ ऑगस्ट, २०१४ च्या शासन निर्णयान्वये वृध्द कलावंतांच्या मानधनात दीडपटीने वाढ करण्यात आली आहे.

---

**जुन्नर (जि.पुणे) येथील किल्ले शिवनेरी व हरण टेकडी परिसर स्वच्छ ठेवण्याबाबत**

**(४) ३०२७२ (२८-०४-२०१६). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जुन्नर (जि.पुणे) येथील किल्ले शिवनेरी व हरण टेकडी हा निसर्गरम्य परिसर असून येथे फुटलेल्या कांचामुळे प्रदुषणाच्या विळख्यात अडकला असून याठिकाणी मद्यपान करणाऱ्या मद्यपींवर कोणाचेही नियंत्रण नसल्याचे दिनांक ११ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील परिसर स्वच्छ ठेवण्याबाबत तसेच मद्यपींवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (११-०७-२०१६) :** (१) नाही.

अधिक्षक पुरातत्वविद, भारतीय पुरातत्व सर्वेक्षण मंडल कार्यालय मुंबई तसेच पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय), पुणे ग्रामीण यांनी दिलेल्या माहितीनुसार अशा प्रकारची कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही. तसेच येथील परिसरात सुरक्षेच्या दृष्टीने पोलीसांकडून गस्त घालण्यात येते. तसेच हरण टेकडी हा परिसर खाजगी मालकीच्या असल्याने जागा मालकास परिसरात लक्ष ठेवण्यासाठी खाजगी सुरक्षारक्षक नेमण्याबाबत समज देण्यात आली आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औषध पुरवठा करणाऱ्या पुरवठादारांची वैद्यकीय शिक्षण विभागाकडे असलेली थकित रक्कम**

**(५) ३०३२७ (२०-०१-२०१६). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औषध विक्रेत्यांनी औषध पुरवठा केल्यानंतर १२० दिवसात पेमेंट करण्याची अट असतानाही या कालावधीत शासनाने रक्कम अदा न केल्याने औषधांची ज्यादा दराने विक्री केली गेल्याने वैद्यकीय शिक्षण व सार्वजनिक आरोग्य विभागातील औषधांच्या दरांमध्ये तफावत येत असल्याचा खुलासा विभागाने दिनांक २६ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास केला, हे खरे आहे काय,

(२) तसेच, वैद्यकीय शिक्षण विभागाला औषध पुरवठा करणाऱ्यां पुरवठादारांचे सुमारे ३० कोटी रुपये थकले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१९-०७-२०१६) :** (१) हे खरे नाही

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही

---

**धुळे तालुक्यातील पांझरा नदी सुधार प्रकल्पाचे काम प्रलंबित असल्याबाबत**

**(६) ३०६९८ (१४-०१-२०१६). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे तालुक्यातील पांझरा नदीचे प्रदुषण थांबविण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या पांझरा नदी सुधार प्रकल्पाचे काम ३०० कोटी रुपयावर गेले असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्प मार्गे लावण्यासाठी शासनस्तरावर कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (२३-०५-२०१६) :** (१) व (२) हे अंशतः खरे आहे.

धुळे तालुक्यातील पांझरा नदीचे प्रदुषण थांबविण्यासाठी राबविण्यासाठी राष्ट्रीय कृती योजनेतंर्गत धुळे महानगरपालिकेकडून प्राप्त झालेला रु.१४८ कोटीचा प्रस्ताव केंद्र शासनास दि.०५.०१.२०१६ रोजी पाठविला आहे. तथापि केंद्र शासनाने दि.२६.०२.२०१६ रोजीच्या पत्रान्वये निधी उपलब्ध नसल्याचे कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मावळ (जि.पुणे) तालुक्यातील एकवीरा देवी मंदिर व परिसराचा विकास करण्याबाबत**

**(७) ३२८८८ (२१-१२-२०१५). श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मावळ (जि.पुणे) तालुक्यातील एकवीरा देवी मंदिर व परिसराचा विकास भारतीय पुरातत्व विभाग व वन विभागाच्या लालफितीमध्ये अडकून पडल्याने गडावर भाविकांना व पर्यटकांना सुविधा मिळत नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एकविरा देवीच्या मंदिराच्या घंटेवर १८५७ ही अक्षरे असून या मंदिराचा जीर्णोध्दार १८६६ मध्ये झाल्याचा माहितीपर शिलालेख या ठिकाणी आहे यावरुन हे मंदिर खूप प्राचीन आहे काय,

(३) असल्यास, गडाचा काही भाग हा वन विभागाचा आहे, तर लेणीचा व पायऱ्यांचा परिसर हा भारतीय पुरातत्व विभागाच्या ताब्यात असल्याने या ठिकाणी एकवीरा देवस्थान ट्रस्टला कोणतेही विकासकाम करण्यास मान्यता दिली जात नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पुरातत्व व वन विभागाच्या दुर्लक्षामुळे वंचित असलेल्या एकवीरा देवी गडावर विकास करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०१-०७-२०१६) :** (१) नाही.

कार्ले लेणी हे राष्ट्रीय संरक्षित स्मारक असून ते अधिक्षक पुरातत्वविद्, भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, मंडल कार्यालय मुंबई यांच्या अखत्यारीत येते. सदर राष्ट्रीय संरक्षित स्मारकाच्या परीसरात एकवीरा देवीचे मंदीर आहे. अधिक्षक पुरातत्वविद् यांनी दिलेल्या माहितीनुसार कार्ले लेणी येथे येणाऱ्या पर्यटकांरीता मुंबई मंडल, मंजूर जतन कार्यक्रम व निधीच्या उपलब्धतेनुसार सोयी सुविधा पुरविते.

(२) होय.

पुणे जिल्ह्याच्या गॅझेटिअरमध्ये नमूद केल्यानुसार एकवीरा देवीचे मंदिर फेब्रुवारी-मार्च १८६६ मध्ये बांधण्यात आला. पुरातत्वच्या व्याख्येनुसार १०० वर्षापूर्वीची कोणतीही वास्तू प्राचीन असते. सबब हे मंदिर प्राचीन आहे.

(३) हे खरे आहे.

एकवीरा देवी मंदीर स्मारकाच्या संरक्षित क्षेत्रात स्थित आहे.Ancient Monument and Archeological Sites and Remains Act १९५८ (and amended in २०१०) या कायद्यानुसार राष्ट्रीय संरक्षित स्मारकाच्या संरक्षित क्षेत्रात कोणतेही बांधकाम किंवा फेरफार करता येत नाहीत. तसेच राष्ट्रीय संरक्षित स्मारकाच्या परिसरात भारतीय पुरातत्व सर्वेक्षणाव्यतिरिक्त (भा.पु.स.) कोणतीही संस्था विकास कामे करु शकत नाही.

(४) अधिक्षक पुरातत्वविद् यांनी दिलेल्या माहितीनुसार तथापि कार्ले लेणी येथे जेणाऱ्या पर्यटकांकरीता मुंबई मंडल, मंजूर जतन कार्यक्रम व निधीच्या उपलब्धतेनुसार सोयी सुविधा पुरविते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड जिल्हयात स्वच्छतागृह बांधकामास निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(८) ३४६९९ (२१-०१-२०१६). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयात स्वच्छतागृह बांधकामासाठी यावर्षी थकीत रक्कमेसह प्रशासनाने ११० कोटी रुपयांची मागणी केली असता त्यापैकी नांदेड जिल्हयाला फक्त २१ कोटी रूपये दिले आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुळात मागील वर्षी केलेल्या कामाचे ४४ कोटी रुपयांचे अनुदान वाटप करणे शिल्लक असतांना चालू वर्ष व मागील वर्षासाठी फक्त २१ कोटी रूपयेच देण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, नांदेड जिल्हयाला स्वच्छता बांधकामासाठी पुरेशी निधी उपलब्ध करून देण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे?

**श्री. बबनराव लोणीकर (१२-०७-२०१६) :** (१) अंशतः खरे आहे.

सन २०१५ - १६ करीता केंद्र पुरस्कृत स्वच्छ भारत मिशन (ग्रा.) अंतर्गत रु. १२०१८.७६ लक्षाचा नांदेड जिल्हा परिषदेचा वार्षिक कृती आराखडा तयार करण्यात आलेला होता. सन २०१५ - १६ या आर्थिक वर्षात केंद्र पुरस्कृत स्वच्छ भारत मिशन (ग्रा.) अंतर्गत नांदेड जिल्हयाला रु. ६४८०.१६ लक्ष इतका निधी वितरीत करण्यात आलेला आहे. त्यापैकी रु. ६१२८.३६ लक्ष इतका निधी, नांदेड जिल्हयातील १६ तालुक्यांच्या गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांच्याकडे सदर कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी मागणीनुसार वर्ग करण्यात आलेला आहे.

(२) व (३) केंद्र पुरस्कृत स्वच्छ भारत मिशन (ग्रा.) अंतर्गत दिनांक २ ऑक्टोबर, २०१४ पासून शौचालय बांधकामाचे अनुदान सुधारीत करुन रु. १२,०००/- इतके करण्यात आलेले आहे. नांदेड जिल्हा परिषदेस सन २०१४ - १५या आर्थिक वर्षात केंद्र पुरस्कृत स्वच्छ भारत मिशन (ग्रा.) अंतर्गत उपलब्धतेनुसार केंद्र हिश्याचा रु. १२४१.९७ लक्ष व राज्य हिश्याचा रु. १४७३.३० लक्ष असा एकूण रु. २७१५.२७ लक्ष इतका निधी वितरीत करण्यात आलेला आहे.

सन २०१५ - १६ या आर्थिक वर्षात नांदेड जिल्हा परिषदेस केंद्र पुरस्कृत स्वच्छ भारत मिशन (ग्रा.) अंतर्गत उपलब्धतेनुसार केंद्र हिश्याचा रु. ३७१७.६१ लक्ष व राज्य हिश्याचा रु. २७६२.५५ लक्ष असा एकूण रु. ६४८०. १६ लक्ष इतका निधी वितरीत करण्यात आलेला आहे.

---

**अकोला जिल्हयातील सर्वोपचार रुग्णालयातील अस्वच्छता**
**व रुग्णांकडे होत असलेले दुर्लक्ष**

**(९) ३५७९२ (२०-०१-२०१६). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्हयातील सर्वोपचार रुग्णालयातील परिसरात गत ३ वर्षापासुन दुर्लक्षीत होत असलेले घाणीचे साम्राज्य व रुग्णांकडे होत असलेले दुर्लक्ष याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी पाहणी करुन तसेच रुग्णांनी तक्रारी करुन, संबंधीत वैद्यकिय महाविद्यालयाचे अधिष्ठाता व जिल्हा शल्य चिकित्सक यांच्या निदर्शनास आणून दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त, सर्वोपचार रुग्णालयाकडून कोणतीही दखल न घेता सतत दुर्लक्ष केले जाते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाचे संबंधीत विभागाकडे अशा तक्रारी/पाहणी यांच्या नोंदी आहेत काय व याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१९-०७-२०१६) :** (१) नाही.
(२) नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या पाणी पुरवठा विभागात झालेला गैरव्यवहार**

**(१०) ३६७४० (२०-०१-२०१६). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या पाणी पुरवठा विभागातील गैरव्यवहाराची चौकशी होऊन अहवाल सादर केला जातो परंतु कोणतीच कारवाई होत नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या विभागातील किती गैरव्यवहाराच्या प्रकरणांचे चौकशी अहवाल सादर करण्यात आले आहेत,
(३) असल्यास, या अहवालानुसार आतापर्यंत किती प्रकरणी कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१७-०७-२०१६) :** (१) नाही.
(२) व (३) कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या ग्रामीणा पाणीपुरवठा विभागातील ३० योजनांमधील गैरव्यवहाराबाबत चौकशी अहवाल प्राप्त झाले आहेत. त्यापैकी ८ प्रकरणांमध्ये त्रुटी नसल्याने निकाली काढण्यात आले. ६ प्रकरणी संबंधितांवर फौजदारी करण्यात आली असून वसूली करण्यात आली आहे. १४ प्रकरणांमध्ये संबंधितांचे खुलासे मागविण्यात आले आहेत. खुलासे प्राप्त झाल्यानंतर पुढील कारवाई करण्यात येईल. उर्वरित २ प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शासकीय वैद्यकिय महाविद्यालय, नागपूर येथील कोबाल्ड उपकरण बंद असल्याबाबत**

**(११) ४०१५८ (०३-०५-२०१६). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासकीय वैद्यकिय महाविद्यालय, नागपूर येथील कर्करोग विभागातील कोबाल्ड उपकरण बंद असल्याने अनेक कर्करोगाने ग्रस्त असलेल्या रुग्णांना रेडियोथेरपी उपचार बंद आहेत, हे खरे आहे काय.

(२) असल्यास, या संदर्भात मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, यांना तक्रार करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गत ९ वर्षापासुन कालबाहय झालेल्या कोबाल्ड मशिनचे र्निलेखन न करता नविन उपकरणाची व्यवस्था करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, नविन कोबाल्ड उपकरण खरेदी करण्याकरीता वैद्यकिय शिक्षण विभागाने उपाययोजना आखली आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२१-०७-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२) अशा प्रकारची तक्रार विभागास प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही.
(३) हे खरे नाही.
यंत्र सुरु असून रुग्णसेवेत कार्यान्वित असल्याने निर्लेखनाचा प्रश्नच उद्‌भवत नाही.
सदर यंत्राची कार्यक्षमता वाढविण्यासाठी सोर्सची खरेदी करण्यात आलेली आहे.
(४) नव्याने सोर्स स्थापित करण्यात आले असून, रेडियेशनची क्षमता वाढविण्यात आलेली आहे. त्यामुळे नविन कोबाल्ट युनिट स्वतंत्र खरेदी करण्यासाठी संचालनालयाकडून प्रस्तावित करण्यात आलेले नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## उरण (जि. रायगड) तालुक्यातील करंजा प्रवासी जेट्टीला लागून खोपेटे परिसरातील एका कंटनेर यार्डने व मोरा विभागात सीआरझेड कायदयाचे उल्लंघन झाल्याबाबत

**(१२) ४०३४८ (२८-०४-२०१६). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उरण (जि. रायगड) तालुक्यातील करंजा प्रवासी जेट्टीला लागून खोपेटे परिसरातील एका कंटनेर यार्डने सीआरझेड कायदयाचे उल्लंघन केले तर मोरा विभागातील बहुतांशी इमारती सीआरझेड कायदयाचे उल्लंघन करुन बांधल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सीआरझेड चे उल्लंघन करणा-यांबाबत प्रशासनाकडे तक्रार करुन कोणतीच कारवाई करण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सीआरझेडचे उल्लंघन करणा-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच याबाबतची सद्यःस्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (११-०७-२०१६) :** (१) हे अंशतः खरे आहे.
(२), (३) व (४) मोरा किनाऱ्यावरील अतिक्रमणे ही सदर ठिकाणच्या कोळी लोकांना गावठाणातील जागा नसल्याने मासळी सुकविणे व अन्य कारणासाठी पुर्वी बंदरे विभागाकडून त्यांना भाडेपट्टयांने दिलेल्या समुद्रापैकीच्या जागेवर केलेली आहेत. त्यातील निवासी

कारणासाठी करण्यात आलेली अतिक्रमणे ही अगदीच हेतुपूरस्कृत व जाणून बूजून केलेली नसून गरजेपोटी केलेली आहेत. त्यामुळे सदर अतिक्रमणे दुर करणे अथवा नियमित करणेबाबतचा प्रस्ताव शासनस्तरावर (महसूल विभाग) प्रलंबित आहे.

---

**श्रीगोंदा (जि.अहमदनगर) तालुक्यातील ५५ पाणीपुरवठा योजनांच्या चौकशीबाबत**

**(१३) ४०५२७ (२८-०४-२०१६). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीगोंदा (जि.अहमदनगर) तालुक्यातील ५५ पाणीपुरवठा योजनांच्या चौकशीचे सुरु असलेले काम पूर्ण झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यात काय आढळून आले, त्यानुषंगाने संबंधिताविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०८-०६-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) एकूण ७ योजनांची चौकशी पैकी ५ योजनांचा चौकशी अहवाल पूर्ण झालेला असून पाचही योजनांच्या कामात अनियमितता झालेली नसल्याने कारवाई करण्यात आलेली नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सिंधुदुर्ग जिल्ह्यातील विजयदुर्ग किल्ल्याची झालेली दूरवस्था**

**(१४) ४१०५३ (२८-०४-२०१६). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ऐतिहासिक किल्ला विजयदुर्ग अनेक ठिकाणी ढासळायला सुरुवात झाल्याचे माहे जानेवारी २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, राज्यातील इतिहासाची साक्षीदार असणारे अनेक किल्ल्यांची दुरवस्था झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर किल्ल्याचे ऐतिहासिक ठेवण जतन करण्यासाठी व किल्ल्याची झालेली पडझड रोखण्यासाठी तसेच राज्यातील सर्व ऐतिहासिक ठेवीचे जतन करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (११-०७-२०१६) :** (१) नाही.

विजयदुर्ग किल्ला हा राष्ट्रीय संरक्षित स्मारक असून तो भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, मंडल कार्यालय मुंबई च्या अखत्यारीत येतो. अधिक्षक पुरात्वविद्, भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, मंडल कार्यालय, मुंबई यांनी दिलेल्या माहितीनुसार हे खरे नाही.

(२) व (३) राज्यातील एकूण ४७ किल्ले राष्ट्रीय संरक्षित स्मारक म्हणून घोषित करण्यात आले आहे. सदर किल्ल्यांच्या जतन व दुरुस्तीची कार्यवाही भारतीय पुरातत्व सर्वेक्षण मंडल कार्यालय मुंबई, औरंगाबाद व नागपूर यांच्यामार्फत करण्यात येते, तसेच राज्यातील एकूण ४९ किल्ले राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित करण्यात आले आहेत. सदर किल्ल्यांच्या जतन व दुरुस्तीची कार्यवाही राज्याच्या पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालयामार्फत करण्यात येते. राज्यातील गड किल्ल्यांच्या जतन व दुरुस्तीकरीता मा.मंत्री, सांस्कृतिक कार्य यांच्या अध्यक्षतेखाली गड संवर्धन समितीची स्थापना करण्यात आली आहे. सदर समितीने केलेल्या शिफारशी विचारात घेऊन राज्यातील १४ किल्ले मॉडेल फोर्ट म्हणून विकसीत करण्यात येत आहे. यात माणिकगड किल्ला, अंबागड किल्ला, नगरधन किल्ला, शिरंगाव किल्ला, गाळवा किल्ला, खर्डा किल्ला, तोरणा किल्ला, भुदरगड किल्ला, औसा किल्ला, परांडा किल्ला, माहूर किल्ला, कंधार किल्ला, अंतूर किल्ला, धारुर किल्ला यांचा समावेश आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विष्णुपुरी (जि. नांदेड) येथे असलेल्या डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालयातील अंध, अपंग कर्मचा-यांना मूलभूत सोयीसुविधा देण्याबाबत**

**(१५) ४१२७२ (०३-०५-२०१६). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), डॉ.तुषार राठोड (मुखेड) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विष्णुपुरी (जि. नांदेड) येथे असलेल्या डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालयातील दूरध्वनी विभागात कार्यरत असलेल्या अंध, अपंग कर्मचा-यांनी निवासी डॉक्टरांना देण्यात येणा-या मूलभूत सोयीसुविधेप्रमाणे सुविधा देण्याची मागणी अधिष्ठाता यांच्याकडे दिनांक ५ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रुग्णालयातील अंध, अपंग कर्मचा-यांना कोणत्याच मूलभूत सोयी-सुविधा उपलब्ध नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, सदर रुग्णालय संकुलातील अनेक कामे अर्धवट असल्याने रुग्णांचे, रुग्णांच्या नातेवाईकांचे, कर्मचारी यांचे मुलभूत सुविधांअभावी गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, विहित कालावधीत उक्त रुग्णालयाची कामे पूर्ण न करणाऱ्या कंत्राटदारांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,
(५) सदर रुग्णालयातील अंध, अपंग कर्मचा-यांना मूलभूत सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत व संकुलातील अनेक अर्धवट कामे पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०५-०७-२०१६) :**(१) होय.

(२) नाही.

(३) अंशतः खरे आहे.

(४) व (५) विष्णूपूरी येथे नव्याने बांधण्यात येणा-या रुग्णालय संकुलाचे बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभागाकडे सोपविण्यात आले आहे. सदर विभागाने विहित मुदतीत आवश्यक ती बांधकामे पूर्ण न केल्याने संस्था स्तरावरुन सदरची बांधकामे पूर्ण करण्याबाबत त्यांना कळविण्यात आलेले आहे. तसेच अपंग कर्मचा-यांना आवश्यक त्या सर्व सोयी सुविधा पुरविण्यात आलेल्या आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सीपीआर रुग्णालयात (जि.कोल्हापूर) उपचारासाठी येत असलेल्या रुग्णांची होत असलेली फसवणूक**

**(१६) ४१४१४ (०३-०५-२०१६). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील सीपीआर रुग्णालयात दररोज हजारो गोरगरीब व खेड्यापाड्यातून रुग्ण उपचारासाठी येतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बाहेरगावाहून आलेल्या अनेक रुग्णांना पूर्ण माहिती नसल्याने काही जण आपण सामाजिक कार्यकर्ते किंवा अमुक पक्षाचा पदाधिकारी असल्याचे भासवून मदतीच्या नावाखाली पैशाची मागणी करून त्यांची फसवणूक करतात, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानंतर सदरची टोळी शासकीय रुग्णालयातील काही कर्मचाऱ्यांना हाताशी धरून सबंधित रुग्णाचे काम त्वरीत करण्यासाठी ५० ते ५०० रुपयापर्यंत रक्कम मागून आपआपसात वाटून घेऊन रुग्णांची सर्रास लुट करतात, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने गोरगरीब रुग्णांची होत असलेली फसवणूक थांबवण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०७-०७-२०१६) :**(१) होय.

(२) नाही.

याबाबत कोणतीही लेखी किंवा मौखिक तक्रार प्राप्त झालेली नाही.

(३) नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खामगांव (जि.बुलढाणा) तालुक्यातील झुणका भाकर**
**केंद्र पूर्ववत सुरु करण्याबाबत**

**(१७) ४१४८३ (१३-०५-२०१६). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगांव (जि.बुलढाणा) तालुक्यात झुणका भाकर केंद्र योजनेंतर्गत सन १९९५ साली तत्कालीन शासनाने बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी व गोरगरिबांना १ रुपयात झुणका भाकर मिळावी या उद्देशातून या केंद्राचे वितरण केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील काही काळात तत्कालीन शासनाने हे झुणका भाकर केंद्र सिल करून नागरिकांना उदार निर्वाहाच्या साधनापासून वंचित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर केंद्र संचालकांना पूर्ववत रोजगार उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीकोनातून ती जागा व केंद्र पूर्ववत मुळ मालकांना देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०१-०७-२०१६) :** (१) हे खरे आहे. राज्यातील गरीब व गरजू जनतेला वाढत्या महागाईपासून दिलासा मिळावा म्हणून रु. १/- या अल्प दरात झुणका भाकर उपलब्ध करुन देण्याची योजना शासनाने दिनांक १ मे, १९९५ पासून सुरु केली होती. त्यानुसार खामगाव तालुक्यामध्ये एकूण २९ झुणका भाकर केंद्राचे वितरण करण्यात आले होते.

(२) सदर योजना राबविण्यात आलेल्या अनुभवाचा साकल्याने विचार करुन सदर योजना पूर्णपणे बदं करण्याचा निर्णय शासनाने दिनांक २७.०६.२००० च्या शासन निर्णयान्वये घेतला. तसेच सदर योजना बंद झाल्यानंतर झुणका भाकर केंद्र ताब्यात घेण्याबाबत सविस्तर सुचना शासन परिपत्रक दिनांक २७.०६.२००० अन्वये निर्गमित करण्यात आल्या आहेत.

(३) व (४) झुणका भाकर योजना बंद करण्याच्या शासनाच्या या निर्णयाच्या विरोधात काही झुणका भाकर केंद्र चालकांनी मा. उच्च न्यायालय व मा. सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केल्या होत्या. सदर याचिका मा. उच्च न्यायालय व मा. सर्वोच्च न्यायालयाने खारीज केलेल्या आहेत. सदरची बाब लक्षात घेता, झुणका भाकर योजना पूर्ववत चालू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन नाही.

---

**राज्यातील स्वस्त धान्य दुकानदार संघटनेने संप पुकारल्याबाबत**

**(१८) ४२५३९ (२८-०४-२०१६). श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील स्वस्त धान्य दुकानदार संघटनेने संप पुकारून ऐन दुष्काळात गोरगरिबांना वेठीस धरले असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तीव्र दुष्काळाच्या परिस्थितीत लाभार्थ्यांना अन्नधान्य पुरवठ्याची कोणती पर्यायी व्यवस्था करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (३१-०५-२०१६) :** (१) राज्यातील स्वस्तधान्य दुकानदार संघटनेने संपाची सूचना दिलेली होती.
(२) राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम २०१३ व २०१४ अन्वये दुष्काळग्रस्त जिल्ह्यातील शेतक-याना विहित केलेल्या दराने अन्न धान्य देण्यात येते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हाफकिन महामंडळामध्ये रोजंदारीवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना कायमस्वरुपी सामावून घेण्याबाबत**

**(१९) ४३१२८ (०३-०५-२०१६). श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील परेल भागातील हाफकिन महामंडळामधील पोलीओ, मौखीक द्रव्य, प्राणीगृह न्यु सेंट्रल पिलिंग ॲण्ड पॅकिंग, मेडियाकेसिन, भांडार, जावक, औषध निर्माण या सर्व विभागांमध्ये सन १९९४ ते १९९५ या वर्षात रोजंदारीवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना हाफकिन महामंडळामध्ये कायमस्वरुपी सामावून घ्यावे यासाठी कर्मचाऱ्यांनी औद्योगिक न्यायालयात दावा दाखल केल्यानंतर महामंडळाच्या सामान्य प्रशासन विभागाने सन १९९५ पर्यंतचे २२८ रोजंदारी कर्मचारी यांची सेवाज्येष्ठतेनुसार यादी तयार केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महामंडळाने सन १९९४ पर्यंतच्याच फक्त १३३ कर्मचाऱ्यांना कायमस्वरुपी महामंडळात सामावून घेतल्यामुळे उर्वरित कर्मचाऱ्यांना पुन्हा रोजंदारीवर कामावर ठेवल्यामुळे त्यांनी औद्योगिक न्यायालयात दावा दाखल केल्यानंतर औद्योगिक न्यायालयाने दिनांक ४ नोव्हेंबर, २०११ रोजी उर्वरित रोजंदारीवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना सन १९९५ मध्ये महामंडळाने तयार केलेल्या ज्येष्ठता यादीनुसार कायमस्वरुपी सेवेत सामावून घ्यावेत असे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महामंडळाने औद्योगिक न्यायालयाच्या आदेशाचे पालन न करता उर्वरित रोजंदारी कर्मचाऱ्यांना कायमस्वरुपी सेवेत सामावून न घेता दिनांक ९ एप्रिल, २०१२ व १५ मे, २०१२ मध्ये उत्पादन सहायक “अ” या पदासाठी लेखीपरीक्षा व मुलाखती घेऊन नवीन कर्मचाऱ्यांची भरती केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, त्याची कारणे काय आहेत वा सन १९९४ ते १९९५ मधील सेवेत सामावून न घेतलेल्या कर्मचाऱ्यांना कायमस्वरुपी सेवेत सामावून घेण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१६-०७-२०१६) :**(१) होय.
(२) नाही.
(३) व (४) मा.औद्योगिक न्यायालयाच्या दि.२४/०८/२०११ च्या आदेशानुसार महामंडळात उपलब्ध असलेल्या कामानुसार उर्वरित रोजंदारी कर्मचा-यांच्या ज्येष्ठता यादीप्रमाणे चक्राकार पध्दतीने काम देण्याचे आदेश दिले आहेत. यानुसार पाच रोजंदारी कर्मचा-यांना काम देण्यासाठी उपलब्ध असल्याबाबत महामंडळाने याचिकाकर्त्याला कळविले आहे. तसेच सन-२०१२ मध्ये झालेल्या अनुशेषाच्या भरती प्रक्रियेमध्ये रोजंदारी कर्मचारी निवड प्रक्रियेत पात्र ठरत नसल्याने त्यांची निवड झाली नाही. तसेच हाफकिन महामंडळाची मंजूर पदांची संख्या ६७८ असल्याने उर्वरित रोजंदारी कर्मचा-यांना कायमस्वरुपी सेवेत सामावून घेता येणार नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर येथील वैद्यकीय रुग्णालयामध्ये निकृष्ट आहार दिला जात असल्याबाबत

**(२०) ४३३०९ (०३-०५-२०१६). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर येथील वैद्यकीय रुग्णालयामध्ये रुग्णाना पोषक आहाराऐवजी केवळ मोजकाच आणि निकृष्ट आहार दिला जात असल्यामुळे रुग्णांवर उपासमारीची वेळ आली असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रुग्णाला पौष्टिक आहार देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१९-०७-२०१६) :**(१) नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील आदिवासी पाड्यांना पाणीपुरवठा करण्यासाठी धरण बांधण्याबाबत

**(२१) ४३४८४ (०३-०५-२०१६). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.अमित साटम (अंधेरी**

**पश्चिम), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील आदिवासी पाड्यांना पाणीपुरवठा करण्यासाठी धरण बांधण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या धरणाचे नकाशे व अंदाजपत्रके तयार करण्यात आले आहेत काय,

(३) असल्यास, या धरणावर किती खर्च करण्यात येणार आहे व किती गावांना व पाड्यांना या धरणातून पाणी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे,

(४) असल्यास, सदर धरण बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१८-०७-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात मुख्यमंत्री पेयजल योजनांची नियमावली निश्चित करण्यात आली नसल्याबाबत**

**(२२) ४३५६३ (०३-०५-२०१६). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यभरातील राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत नवीन पाणी पुरवठा योजनांचे आराखडे शासनाला सादर करण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने दिनांक २९ जून, २०१५ पूर्वीच्या कार्यारंभ आदेश दिलेल्या योजनांपैकी निधी देण्याचे सुत्र स्विकारले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील ८ हजाराकडून अधिक नवीन पाणी पुरवठा योजना ह्या सूत्रामुळे अडचणीत आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, मुख्यमंत्री पेयजल ग्रामीण पाणीपुरवठा योजनेसाठी पुरेसा निधी उपलब्ध नसल्यामुळे राज्यातील प्रस्तावित ५३८५ पाणीपुरवठा योजना निर्णयाविना प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(५) तसेच ग्रामीण पाणीपुरवठा विभागाच्या काम चालू असलेल्या २३२४ पाणीपुरवठा योजना निधीअभावी अर्धवट स्थितीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, एक हजार कोटी रुपयांची मुख्यमंत्री पेयजल योजना प्रस्तावित करुनही त्यासंबंधीची नियमावली अद्यापही निश्चित करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(७) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०२-०७-२०१६) :** (१) हे खरे आहे.
(२) केंद्र शासनाच्या दि.२९/०६/२०१५ च्या पत्रान्वये प्रगतीपथावरील योजना, फ्लोराईड बाधित गावे/वाड्या व संसद आदर्श ग्राम योजनांतर्गत समावेश असलेल्या गावे/वाड्या इत्यादी योजनांना प्राधान्याने निधी उपलब्ध करुन देण्याबाबत सूचना प्राप्त झालेल्या होत्या. त्या अनुषंगाने शासनाने दि. ३०/०६/२०१५ च्या पत्रान्वये सर्व जिल्ह्यांना याबाबत निर्देश देण्यात आले. तसेच कामे सुरु न झालेल्या पाणी पुरवठा योजना पुढील आदेश होईपर्यंत हाती घेण्यात येऊ नये अशाही सूचना देण्यात आल्या.
(३), (४) व (५) हे खरे नाही.
प्रगतीपथावरील योजनांवर उपलब्ध निधी खर्च करण्याच्या सूचना आहेत.
(६) मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम राबविण्यास शासन निर्णय क्र.ग्रापाधो-१११५/प्र.क्र.९२/पापु-०७, दि.०७/०५/२०१६ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे शहरातील ससून रुग्णालयात रुग्णांना माफक दरात चांगले उपचार मिळण्याबाबत

**(२३) ४३५७५ (०३-०५-२०१६). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरातील ससून रुग्णालयात उपचारासाठी आवश्यक त्या सोयी सुविधा मिळाल्यास पुणे आर्थोपडीक सोसायटीचे सदस्य असलेले डॉक्टर ससून रुग्णालयात महिन्यातून एक दिवस मोफत उपचार करायला तयार असल्याचे आर्थोपेडीक सोसायटीचे अध्यक्ष यांनी दिनांक ७ नोव्हेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास जाहीर केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ससून रुग्णालयामध्ये रुग्णांना माफक दरात चांगले उपचार मिळत नसल्याच्या अनेक तक्रारी रुग्णांकडून येत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त रुग्णालयातील गरीब रुग्णांना मोफत उपचार देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१९-०७-२०१६) :** (१) होय, तथापि सदर सोयायटीने याबाबत रुग्णालय प्रशासनास लेखी कळविलेली नाही.
(२) नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्ह्यातील शहरातील व ग्रामीण भागातील**
**कुटुंबांना रॉकेलचा पुरवठा करण्याबाबत**

**(२४) ४३६९९ (२८-०४-२०१६). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यात शहरातील व ग्रामीण भागातील कुटुंबांना गॅस कनेक्शन नसल्याने व ७३ लाख लिटर रॉकेलची आवश्यकता असताना तेवढा रॉकेल पुरवठा होत नसल्याने वृक्षतोड होत असल्याने पर्यावरणाची हानी होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने नाशिक शहरी आणि ग्रामीण भागासाठी पुरेशा प्रमाणात रॉकेल पुरवठा करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०१-०६-२०१६) :** (१) व (२) हे खरे नाही.

सुधारित परिमाण लागू होण्यापूर्वी नाशिक जिल्ह्यास माहे एप्रिल, २०१५ ते ऑगस्ट, २०१५ या कालावधीत २०६४ कि.ली केरोसिन नियतन उपलब्ध करुन देण्यात येत होते.

माहे सप्टेंबर, २०१५ पासून नाशिक जिल्ह्याची केरोसिनची मागणी २०८८ कि.ली इतकी आहे.

शिधापत्रिकांवर गॅस स्टँपिंगची कार्यवाही करण्यात आल्यामुळे माहे मार्च, २०१६ पासून नाशिक जिल्ह्याची केरोसिनची मागणी १२८४ कि.ली. इतकी असून नाशिक जिल्ह्यास मागणीच्या १००% इतक्या प्रमाणात केरोसिन उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही

---

**तारळ व वाडापाल्ये (ता.रत्नागिरी,जि.रत्नागिरी) खारभूमी**
**योजनेला सीआरझेडमधून सूट मिळणेबाबत**

**(२५) ४४०४९ (२८-०४-२०१६). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तारळ व वाडापाल्ये (ता.रत्नागिरी, जि.रत्नागिरी) खारभूमी योजनेला सीआरझेडमधून सूट मिळणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १६ डिसेंबर, २०१४ रोजी व त्यानंतरही अनेक वेळा मा. मुख्यमंत्री यांना पत्रव्यवहार केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सीआरझेड अधिसूचना २०११ नुसार उपरोक्त नमुद नवीन खारभूमी योजनांसाठी जलद पर्यावरणीय आघात मुल्यांकन अहवाल सादर करणे आवश्यक असल्याने सदर निर्णयानुसार जलद पर्यावरणीय आघात मुल्यांकन अहवाल सादर करणेबाबत अधीक्षक अभियंता, खारभूमी विकास मंडळ, ठाणे यांना कळविण्यात आल्यानुसार सदर अहवाल प्राप्त झाला आहे काय,
(३) नसल्यास, विलंब लागण्याची कारणे काय आहेत, यासंदर्भात केव्हापर्यंत निर्णय होणे अपेक्षित आहे ?

**श्री. रामदास कदम (११-०७-२०१६) :** (१) हे खरे आहे.
(२) सदर अहवाल अद्यापही अप्राप्त आहे.
(३) सदर अहवाल प्राप्त झाल्यानंतर महाराष्ट्र किनारी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये विचारार्थ ठेवण्यात येईल.

---

**शासकीय महाविद्यालयामधून वैद्यकीय शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांना सात वर्षे ग्रामीण भागात सेवा देणे बंधनकारक करणेबाबत**

**(२६) ४४३०० (०३-०५-२०१६). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याच्या ग्रामीण भागात नागरीकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर होत असल्याने शासकीय महाविद्यालयामधून वैद्यकीय शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांना सात वर्षे ग्रामीण भागात सेवा देणे बंधनकारक करणेबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रस्तावास मंजूरी देऊन त्याची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१८-०७-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोला सर्वोपचार रुग्णालयामध्ये एक्सरे मशिन बंद असल्याबाबत**

**(२७) ४४७६७ (२६-०५-२०१६). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), डॉ.संजय कुटे (जळगाव जामोद) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विदर्भाचे ट्रामाकेअर सेंटर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अकोला जिल्ह्यातील सर्वोपचार रुग्णालयामध्ये गत ४ वर्षापासून एक्सरे मशिन बंद असल्यामुळे शेकडो रुग्णांना त्रास सहन करावा लागत असल्याचे दिनांक २३ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एक्सरे मशिन बंद असल्यामुळे रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना खाजगी रुग्णालयात जावून एक्स-रे काढावे लागत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सर्वोपचार रुग्णालयातील रुग्णांची संख्या पाहता नवीन एक्सरे मशिन तातडीने उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२५-०७-२०१६) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) नविन एक्सरे यंत्र खरेदीसाठी निविदा प्रक्रिया संचालनालय स्तरावर सुरु असून लवकरच नविन यंत्रे उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे शहरातील सामाजिक संस्थांना केंद्र शासनाच्या कल्याणकारी योजने अंतर्गत धान्य पुरवठा होत नसल्याबाबत

**(२८) ४४८३६ (२८-०४-२०१६). श्री.सरदार तारासिंह (मुलुंड) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरातील २३ सामाजिक संस्थांना माहे ऑक्टोबर, २०१५ पासून केंद्र शासनाच्या कल्याणकारी योजने अंतर्गत धान्य पुरवठा होत नसल्याची वस्तुस्थिती खरी असून, आवश्यक असलेली मागणी शासनाकडे पाठविली असल्याचे निलिमा धायगुडे, शहर अन्नधान्य पुरवठा अधिकारी यांनी दिनांक २१ जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास जाहीर केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्य शासनाकडून कल्याणकारी योजने अंतर्गत किती धान्याची मागणी आहे याचा प्रस्ताव गेल्या अनेक महिन्यांपासून जिल्हयांकडून मागविलाच नसल्याने व तो केंद्र शासनाकडे राज्य शासनाने पाठविला नसल्याने, केंद्र शासनाकडे कल्याणकारी योजने अंतर्गत मिळणारे धान्य माहे ऑक्टोबर, २०१५ पासून पुणे शहराला व जिल्हयाला मिळाले नसल्याने, शहर व जिल्हयातील विविध २३ सामाजिक संस्थांना केंद्र शासनाच्या कल्याणकारी योजने अंतर्गत अन्नधान्य पुरवठा होऊ शकला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, केंद्र शासनाच्या योजने अंतर्गत मिळणाऱ्या धान्याकरिता राज्य शासनाने जिल्हयांकडून प्रस्ताव मागवून ते केंद्र शासनाकडे पाठविण्याबाबतची कार्यवाही न करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत, सदर कार्यवाही करण्यास अक्षम्य विलंब केलेल्या अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, त्याची कारणे काय आहेत,
(४) तसेच पुणे शहर व जिल्हयातील ज्या २३ सामाजिक संस्थांना केंद्र शासनाच्या कल्याणकारी योजने अंतर्गत अन्नधान्याचा पुरवठा करण्यात आला नाही, अशा संस्थांना अन्नधान्याचा पुरवठा तातडीने सुरु करण्यात येणार आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०१-०६-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) माहे सप्टेंबर, २०१५ पर्यंतच्या कालावधीच्या अन्नधान्याच्या नियतनाचे उपयोगिता प्रमाणपत्र केंद्र शासनास दिनांक ४ फेब्रुवारी, २०१६ च्या पत्रान्वये पाठविण्यात आले माहे ऑक्टोबर, २०१५ पासूनच्या कालावधीकरिता अन्नधान्याच्या नियतनाची मागणी करण्यात आली. केंद्र शासनाकडून अन्नधान्याचे नियतन प्राप्त होईपर्यंत शिल्लक धान्यामधून मागणीनुसार संस्थांना अन्नधान्याचे वाटप करण्यात आले. केंद्र शासनाकडून माहे ऑक्टोबर, २०१५ ते मार्च, २०१६ या कालावधीकरीता अन्नधान्याचे नियतन प्राप्त असून, त्यानुसार दिनांक १ एप्रिल, २०१६ च्या पत्रान्वये अन्नधान्याचे जिल्हानिहाय नियतन देण्यात आले आहे. सदर आदेशान्वये अन्नधान्य वितरण अधिकारी, पुणे यांच्या क्षेत्रातील पुणे शहरास माहे ऑक्टोबर, २०१५ ते माहे २०१६ या कालावधीकरीता ७९२ मे.टन अन्नधान्याचे नियतन देण्यात आले आहे. सद्यःस्थितीत संस्थांची मागणी प्रलंबित नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाघमाता परिसर, दसरा मैदान, परतवाडा (ता. अचलपूर जि.अमरावती) येथे प्रा. राम शेवाळकर साहित्य अकादमी तथा क्रिडा व सांस्कृतिक केंद्र उभारण्याबाबत**

**(२९) ४५०१२ (२८-०४-२०१६). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अचलपूर विधानसभा मतदार संघात वाघमाता परिसर दसरा मैदान, परतवाडा (ता. अचलपूर, जि.अमरावती) येथे साहित्यिक कै.प्रा.राम शेवाळकर यांच्या स्मृती प्रित्यर्थ प्रा.राम शेवाळकर साहित्य अकादमी तथा क्रिडा व सांस्कृतिक केंद्र उभारण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी, अचलपूर यांनी मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचेकडे दिनांक ८ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्राद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत सांस्कृतिक कार्य विभागाने निधीच्या (रु.१० कोटी) बाबत वित्त विभागाचे अभिप्राय घेतले आहेत काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (११-०७-२०१६) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) साहित्य अकादमी तथा क्रिडा व सांस्कृतिक केंद्र उभारण्यास अर्थसहाय्य देण्याची विभागाची कोणतीही योजना नसल्याने या संदर्भात वित्त विभागाचे अभिप्राय घेण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई विद्यापीठाशी संलग्न असलेल्या ७४२ महाविद्यालयांपैकी ४५२ महाविद्यालयात प्राचार्याची पदे रिक्त असल्याबाबत**

**(३०) ४५९३२ (०५-०५-२०१६). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.अजित पवार (बारामती), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाशी संलग्न असलेल्या ७४२ महाविद्यालयांपैकी ४५२ महाविद्यालयात प्राचार्याची पदे रिक्त असल्याची बाब माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एवढया मोठया प्रमाणात प्राचार्यांची पदे रिक्त राहण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर पदे त्वरित भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२२-०७-२०१६) :** (१) अंशत: खरे आहे.

मुंबई विद्यापीठाशी संलग्न असलेल्या एकूण ७४२ महाविद्यालयांपैकी उच्च शिक्षणाशी संबंधित शासकीय ३, अशासकीय अनुदानित ३७, कायम विना अनुदानित २५७ तर तंत्र शिक्षणाशी संबंधित १४० अशा एकूण ४३७ महाविद्यालयांमध्ये प्राचार्यांची पदे रिक्त आहेत.

(२) विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निकषानुसार प्राचार्य पदासाठी विहीत एपीआय निकष (Academic Preformance Indicators) पूर्ण करणारे उमेदवार न मिळणे, कायम विना अनुदानित महाविद्यालयातील सेवा सेवानिवृत्तीवेतनासाठी विचारात न घेणे, प्राचार्य व सहयोगी प्राध्यापक यांच्यामधील वेतनामध्ये फारशी तफावत नसणे तसेच कायम विना अनुदानित महाविद्यालयामध्ये नियमित वेतनाचा प्रश्न निर्माण होणे इत्यादी कारणामुळे प्राचार्यांची पदे मोठ्या प्रमाणावर रिक्त राहत आहेत.

(३) प्राचार्यांची पदे नियमित स्वरुपात भरण्याबाबत उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-२००९/(४३५/०९)/विशि-३, दि.३०.०१.२०१० अन्वये तसेच संचालनालयामार्फत सह संचालक व विद्यापीठांना वारंवार सूचना देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोयनेचे अवजल चिपळूण व खेडमधील ३६ गावांना ग्रॅव्हिटीने देण्याबाबतचे आदेश देण्यात आल्याबाबत**

**(३१) ४६५०८ (०३-०४-२०१६). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.बाळासाहेब मुरकुटे**

**(नेवासा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील पाण्याची गरज लक्षात घेऊन वाया जाणारे कोयनेचे अवजल मुंबईत नेण्याआधी ते चिपळूण व खेडमधील ३६ गावांना ग्रॅव्हिटीने देण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या माध्यमातून सर्वेक्षण करण्याचे आदेश देण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१६ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आलेले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी आतापर्यंत कोणता निर्णय घेतला आहे व त्याची अंमलबजावणी करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१३-०७-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) उक्त प्रकरणी सर्वेक्षणाच्या कामासाठी निधीची तरतुद करण्यात आली असून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत सर्वेक्षणाचे काम सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सिन्नर (जि.नाशिक) तालुक्यातील पांगरी येथील राष्ट्रीय पेयजल योजनेद्वारे पिण्याचे पाणी पुरवठ्याच्या कामामध्ये झालेला गैरव्यवहार

**(३२) ४६६६४ (२८-०४-२०१६). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिन्नर (जि.नाशिक) तालुक्यातील पंचाळेच्या डांबरनाल्यात विहिर खोदून पाईप लाईनद्वारे पांगरीयेथे राष्ट्रीय पेयजल योजनेद्वारे पिण्याचे पाणी पुरवठ्याच्या कामामध्ये गैरव्यवहार झाल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुषंगाने दोषींविरूध्द कोणती कारवाई केली वा करण्योत येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१९-०७-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) मौजे पांगरी बु. ता सिन्नर येथील नळ पाणी पुरवठा योजनेची कामे भौतिकद्ष्ट्या पूर्ण करण्यात येवून योजनेद्वारे दि. १०.१.२०१६ पासून पाणी पुरवठा सुरु करण्यात आला होता. परंतु सिन्नर तालुक्यातील कमी झालेले पर्जन्यमान तसेच कडवा कालव्यातून डांबर नाला पाझर तलावात पाणी न सोडल्याने एप्रिल, २०१६ पासून योजनेद्वारे गावात पाणी पुरवठा करणे शक्य झाले नाही. परंतु गावात मनेगाव १६ गावे प्रादे. पाणी पुरवठा याजेनेतून पाणी पुरवठा करण्यात येतो. तसेच गावास टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्याची आवश्यकता भासलेली नाही. सदर योजनेबाबत श्री. भाऊसाहेब नरहरी बेरागी रा. पांगरी बु. यांनी तक्रार केली होती.

त्यानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांनी त्रयस्थ यंत्रणा म्हणून कार्यवाही अभियंता ल.पा. पूर्व व कार्यकारी अभियंता ल.पा. पूर्व व कार्यकारी अभियंता इ.व.द. विभाग क्र १ जिल्हा परिषद, नाशिक यांचेमार्फत योजनेची चौकशी करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार चौकशी करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार चौकशी करण्यात आली असून प्राप्त अहवालानुसार योजनेच्या कामात गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हयामधील अप्राधान्य गटातील शिधापत्रिकाधारकांना धान्य पुरवठा करणेबाबत**

**(३३) ४६७७१ (२८-०४-२०१६). श्री.चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयामधील अंत्योदय आणि प्राधान्य गटातील २५ लाख ७५ हजार ६९७ लोकांना सध्या अन्न सुरक्षा योजनेचा लाभ मिळत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जिल्हयामधील अप्राधान्य गटातील ९ लाख १९ हजार ६६७ लोकांनी माहे ऑक्टोबर, २०१४ ते एप्रिल, २०१५ अखेर या सात महिन्यामध्ये एक किलो ही धान्य मिळालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अन्न सुरक्षा योजना सुरु झाल्या पासून प्राधान्य व अंत्योदय कार्डधारकांना आवश्यक असणारे नियतन केंद्र शासनाकडून दिले जाते परंतू अप्राधान्य शिधापत्रिकाधारकांना राज्य शासनाने नियतन मंजूर न केल्याने त्यांना रेशन धान्यापासून वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अप्राधान्य शिधापित्रकाधारकांना तात्काळ धान्य पुरवठा करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०१-०६-२०१६) :** (१) अंशतः खरे आहे. कोल्हापूर जिल्हयामध्ये एप्रिल, २०१६ अखेरपर्यंत अंत्योदय आणि प्राधान्य गटातील एकूण २४,७८,४५१ लाभार्थ्यांना अन्नसुरक्षा योजनेचा लाभ मिळत आहे.

(२), (३) व (४) हे खरे आहे. राज्यातील शिधापत्रिकांच्या आधार सिडींगचे काम पूर्ण झाल्यावर राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत समाविष्ट न झालेल्या परंतु लक्ष्य निर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत पुर्वी लाभ घेत असलेल्या १७७.१९ लक्ष लाभार्थ्यांना अन्नधान्याचा लाभ देण्याबाबत निर्णय घेण्यात येईल, असा शासन निर्णय दि.१५ जानेवारी, २०१६ रोजी निर्गमित केला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विष्णूपूरी (जि.नांदेड) येथे डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकिय महाविद्यालय स्थलांतरीत झाल्याने खाटाअभावी रुग्णांची होत असलेली गैरसोय**

**(३४) ४६९५३ (०३-०५-२०१६). श्री.हेमंत पाटील (नांदेड दक्षिण) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विष्णूपूरी (जि. नांदेड) येथे डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकिय महाविद्यालय स्थलांतरीत झाल्याने खाटांअभावी रुग्णांची गैरसोय होत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुग्णांना तात्काळ खाटांची व्यवस्था करण्याची मागणी जिल्हाधिकाऱ्यांकडे मराठा महासंघाच्यावतीने करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू रुग्णालयात तातडीने खाटांची व्यवस्था करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१९-०७-२०१६) :** (१) नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वेंगुर्लेतील (जि. सिंधुदुर्ग) चार शाळा इमारती "सीआरझेड" क्षेत्रात येत असल्यामुळे इमारत बांधकाम होत नसल्याबाबत**

**(३५) ४८१३० (२८-०४-२०१६). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वेंगुर्ला (जि. सिंधुदुर्ग) येथील चार शाळा इमारती "सीआरझेड" क्षेत्रात येत असून या शाळांसाठी अंगणवाडी इमारती मंजूर आहे मात्र सीआरझेड च्या नियमामुळे इमारत बांधकाम करता येत नसल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर क्षेत्रात येणाऱ्या अंगणवाडी बांधकामाकरिता सूट देण्याबाबत नियम शिथिल करण्याबाबत किंवा फेरविचार करण्याबाबत केंद्र शासनाकडे कोणत्या स्वरुपाचा पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (११-०७-२०१६) :** (१) हे अंशतः खरे आहे.

(२) वेंगुर्ले प्रकल्पाकडे सीआरझेड कार्यक्षेत्रात चार इमारती नसून तीन इमारती मंजूर होत्या. त्यापैकीएका अंगणवाडी इमारतीचे बांधकाम सीआरझेड मुळे रद्द करण्यात आलेले असून उर्वरित दोन अंगणवाड्यांच्या बांधकामासाठी जागा उपलब्ध नसल्यामुळे सदरचे प्रस्ताव रद्द करण्यात आलेले आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चिचकुटवस्ती (हिरडगाव) (ता.श्रीगोंदे ,जि.अहमदनगर) येथील**
**पाणी पुरवठा योजना सुरु झाली नसल्याबाबत**

**(३६) ४९७९६ (२८-०४-२०१६). श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिचकुटवस्ती (हिरडगाव) (ता.श्रीगोंदे, जि.अहमदनगर)येथे काही वर्षापूर्वी १२ लाख रुपये खर्च करुन राबविण्यात आलेली पाणीपुरवठा योजना अद्यापपर्यंत सुरु झाली नसल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने नागरिकांना पाणी मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०८-०६-२०१६) :** (१) हे खरे नाही.

सद्यःस्थितीत पाणी टंचाई असल्याने उद्भवास पाणी कमी पडल्याने योजना बंद आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

उद्भवास पाणी कमी असल्यामुळे योजना बंद आहे सद्यःस्थितीत टँकरने पाणी पुरवठा सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाची अंमलबजावणी स्थगित केल्याबाबत**

**(३७) ५०४५१ (०५-०५-२०१६). श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाची अंमलबजावणी स्थगित करण्याबाबत दिनांक ६ फेब्रुवारी, २०१६ रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अभियान बंद केल्यामुळे राज्यभरातून शासनाकडे विविध संघटना व लोकप्रतिनिधींनी तीव्र नाराजी व्यक्त केली , हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर ग्रामस्वच्छता अभियान पूर्ववत सुरु करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२२-०७-२०१६) :** (१) अंशत: खरे आहे.

सन २०१४-१५ व सन २०१५-१६ या वर्षातील संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानांतर्गत सुरु असलेली अंमलबजावणी प्रक्रिया तात्पुर्ती स्थगित करण्याबाबत दि.६ फेब्रुवारी,२०१६ च्या पत्रान्वये कळविण्यात आले होते.

(२) होय,

(३) दि.४ जून,२०१६ च्या शासन निर्णयान्वये संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान अंमलबजावणीच्या सुधारित मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उदगीरच्या ( जि.लातूर) ऐतिहासिक किल्ला परिसरात**
**भगवान पार्श्वनाथाची मुर्ती सापडल्याबाबत**

**(३८) ५०७१२ (२८-०४-२०१६). श्री.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उदगीर (जि.लातूर) येथील ऐतिहासिक किल्ला परिसरात १५०० फूटाच्या अंतरावर खोदकाम करीत असताना माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान भगवान पार्श्वनाथची मुर्ती सापडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मुर्ती सापडल्याची नोंद पुरातत्व विभाग, राज्य शासनाकडे करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ऐतिहासिक किल्ल्यात कार्यरत असलेले जतन अधिकारी यांनी या संबंधी शासनाकडे कोणतीच माहिती दिली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०१-०७-२०१६) :**(१) होय.

(२) नाही.

(३) नाही.

(४) मौजे उदगीर येथे किल्ला परिसरात शेख मुनीर यांच्या मालकीच्या जागेत शाळेच्या बांधकामासाठी करण्यात येत असलेल्या खोदकामात भगवान पार्श्वनाथांची मुर्ती सापडली, तद्नंतर सदर मुर्तीची पाहणी पुरातत्व विभाग औरंगाबाद कार्यालयाने केली. त्यास अनुसरुन सहायक संचालक, पुरातत्व विभाग, औरंगाबाद यांनी तहसिलदार , उदगीर तथा तालुका निखात निधी अधिकारी यांना दिनांक १९.०१.२०१६ च्या पत्रान्वये सदर मुर्ती संबधीतांकडून प्राप्त करुन घेऊन पुरातत्व विभागाकडे हस्तांतरीत करण्याची विनंती केली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ससून (जि.पुणे) रुग्णालयात उपचारासाठी दिरंगाई झाल्यामुळे**
**एका जेष्ठ नागरिक रुग्णाचा झालेला मृत्यू**

**(३९) ५०९०९ (०३-०५-२०१६). श्रीमती मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ससून रुग्णालय, पुणे येथे जेष्ठ नागरिक दिलीप गणपत खैरनार यांच्यावर उपचारासाठी

दिरंगाई झाल्यामुळे रुग्णालयातच त्यांचा मृत्यू झाल्याचे माहे जानेवारी २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच ससून रुग्णालयातील डॉक्टरांनी अनोळखी अपघातग्रस्त जेष्ठ नागरिकांचे प्राण वाचविण्यासाठी ससून रुग्णालयात आणणाऱ्या नागरीकाला अरेरावी व अपमानास्पद वर्तणूक दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंबंधी ससून वैद्यकीय अधीक्षकांनी त्रिसदस्यीय चौकशी समिती स्थापन करून तातडीने अहवाल सादर करण्याचे आदेश देऊनही अद्यापपर्यंत दोषींवर कोणतीही कारवाई झाल्याचे निदर्शनास आले नाही, हे खरे आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१९-०७-२०१६) :**(१) सदर रुग्णाचा मृत्यू उपचारादरम्यान झाला असून त्यांच्या उपचारामध्ये कोणत्याही प्रकारची दिरंगाई किंवा हलगर्जीपणा झालेला नाही.
(२) होय.
(३) नाही.
चौकशी समितीच्या शिफारशीनुसार संबंधित डॉक्टरांवर ज्ञापन बजावण्यात आले असून अशा प्रकारची पुनरावृत्ती झाल्यास त्यांचे शैक्षणिक सत्र रद्द करण्यात येईल अशी सक्त ताकीद देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर येथे उपकरण खरेदीमध्ये होत असलेला विलंब**

**(४०) ५०९४० (०३-०५-२०१६). श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर येथे वाढत्या रुग्णांच्या तुलनेत सुविधा, साधन सामुग्री यांची कमतरता असून उपकरणे खरेदी करण्याकरीता ३ कोटी रुपयांचा निधी मंजूर होऊनही अद्याप फक्त ९६ लाख रुपयांचीच खरेदी करण्यात आली असल्याचे दिनांक २ फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अधिष्ठातांना खरेदीची मर्यादा असल्याने उपकरण खरेदीमध्ये उशीर होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) उक्त उपकरण खरेदीमध्ये होत असलेल्या विलंबाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. गिरीष महाजन (२५-०७-२०१६) :** (१) हे खरे नाही.
संस्थेस सन २०१५-१६ या आर्थिक वर्षाकरीता यंत्रसामुग्री खरेदीसाठी जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत मंजूर झालेला एकूण रु.०३.०० कोटी इतका निधी खर्च करण्यात आला आहे.

(२) हे खरे नाही.

वै.शि.व औ.द्र.वि., शासन निर्णय क्र.: संकीर्ण-२०१४/प्र.क.२०१४/प्र.क्र.६१६/प्रशा-१, दिनांक ३० जानेवारी, २०१५ अन्वये रु.०३ लाखाच्या आतील यंत्रसामुग्रीच्या रु. २५ लाखापर्यंतच्या रक्कमेच्या मर्यादेत वित्तीय अधिकार व प्रशासकीय अधिकार अधिष्ठातांना देण्यात आलेले आहेत.

(३) संस्थेस उपलब्ध निधी पूर्णपणे खर्च झालेला आहे. त्यामुळे कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सॉक्रेटीस ते दाभोळकर-पानसरे व्हाया तुकाराम नाटकाच्या निर्मात्यांवर कारवाई करण्याबाबत

**(४१) ५११५८ (२८-०४-२०१६). श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोणतेही नाटक सादर करण्यापूर्वी नियमानुसार राज्य नाट्य परिनिरीक्षण मंडळाचे प्रमाणपत्र घेणे बंधनकारक असतांना महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या लोकरंग मंचाच्या वतीने सॉक्रेटीस ते दाभोळकर-पानसरे व्हाया तुकाराम या नाटकाचे प्रमाणपत्र घेतले नव्हते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बेकायदेशीरपणे राज्यात १०० च्यावर सदर नाटकांचे प्रयोग केल्याची तक्रार हिंदु जनजागृती समितीने दिनांक ३ सप्टेंबर, २०१५, तर हिंदु विधीज्ञ परिषदेने माहे ऑगस्ट २०१५ मध्ये नाट्य परिनिरीक्षण मंडळ आणि मा.सांस्कृतिक कार्य मंत्री यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त तक्रारीवर तसेच सदर प्रमाणपत्र नसतांना नाटक दाखवणारी विविध नाट्यगृहे, सभागृहांचे व्यवस्थापक आणि प्रमाणपत्राशिवाय जागोजागी नाटक होऊन देणारे संबंधित क्षेत्रांचे पोलीस अधिकारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच बेकायदेशीरपणे नाटक सादर करणा-या नाटकावर, तसेच नाटकाचे लेखक,निर्माते आणि दिग्दर्शक यांच्यावर कारवाई करण्याची कोणकोणती तरतूद शासनाकडे आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (११-०७-२०१६) :** (१) हे खरे आहे.

तथापि, या नाटकास योग्यता प्रमाणपत्रासाठी मंडळाकडे अर्ज प्राप्त झाल्यानंतर दि.२०.०२.२०१६ रोजी सदर नाटकास रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळाचे कायमस्वरुपी योग्यता प्रमाणपत्र देण्यात आले आहे.

(२) होय, नाटय परिनिरीक्षण मंडळाकडे तशी तक्रार प्राप्त झालेली आहे.

(३) व (४) सदर बाब गृह विभागाच्या अखत्यारित येत असल्याने याबाबत उचित कार्यवाही करण्यास गृह विभागास कळविण्यात आले असून त्या विभागामार्फत या प्रकरणी कार्यवाही होणे अपेक्षित आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पाचनई (ता.अकोला, जि.अहमदनगर) येथील हरिश्चंद्रगडावरील प्राचीन शिवमंदीराची दुरुस्ती करण्याबाबत**

**(४२) ५१३०८ (२८-०४-२०१६). श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाचनई (ता.अकोले,जि.अहमदनगर)येथील हरिश्चंद्रगडावरील प्राचीन शिवमंदीर भग्नावस्थेत असून या मंदिराची पुरातत्व विभागाकडून दुरुस्ती करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, सदर प्राचीन मंदिराची दुरुस्ती करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०१-०७-२०१६) :** (१) होय.

(२) हरिश्चंद्रगडावरील प्राचीन शिवमंदिर राष्ट्रीय संरक्षित स्मारक असून ते भारतीय पुरातत्व सर्वेक्षण मंडळ कार्यालय औरंगाबाद यांच्या अखत्यारीत येतात. अधिक्षक पुरातत्वविद्, भारतीय पुरातत्व सर्वेक्षण मंडल कार्यालय, औरंगाबाद यांनी कळविल्यानुसार सदर मंदिराच्या जतन व दुरुस्ती कामाचे अंदाजपत्रक बनविण्यात येत असून निधीच्या उपलब्धतेनुसार जतन व दुरुस्तीची कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुराभिलेख संचालनालयातील कर्मचाऱ्यांची नियमबाहयरीत्या केलेली पदोन्नती**

**(४३) ५१८०३ (२८-०४-२०१६). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मागासवर्गीयांसाठीची पदे सरळसेवेने भरणे व प्रस्तावित सेवाप्रवेश नियमांच्या आधारे नामनिर्देशनाने किंवा पदोन्नतीने पदे भरणे या नियमबाहय केलेल्या कार्यवाही संदर्भात श्री. भा.दा.धाटावकर, संचालक, पुराभिलेख संचालनालय, मुंबई यांच्यावर दिनांक ३० जून, २०११ रोजी "महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम, १९८१ च्या नियम २७ मधील तरतूदीनुसार दरमहा सेवानिवृत्ती वेतनाच्या ६% इतकी रक्कम तीन वर्षाच्या कालावधीकरिता कपात करण्यात यावी अशी शिक्षा करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नियमबाहय नियुक्त्या झालेल्या कर्मचाऱ्यांवर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नियमबाहय नियुक्त्या झालेल्या कर्मचाऱ्यांवर व त्यांची पदोन्नती रोखण्याकरिता कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (११-०७-२०१६) :** (१) होय, श्री.धाटावकर यांनी केलेल्या नियमाबाह्य नियुक्ती व पदोन्नती या संदर्भात त्यांना दिनांक १६.०१.२०१२ च्या कार्यालयीन आदेशान्वये सदर शिक्षा देण्यात आलेली आहे.

(२) व (३) नाही. नियमबाह्य नियुक्त्या झालेल्या कर्मचाऱ्यापैकी पदोन्नत्या देण्यात आलेल्या काही कर्मचाऱ्यांना पदावनत करण्याची कार्यवाही पुराभिलेख संचालनालयाने केली आहे.

तसेच यासंदर्भात पुराभिलेख संचालनालयाकडून प्राप्त अहवालाच्या आधारे वस्तुस्थिती शासनाच्या विधी व न्याय विभागास सादर करण्यात आली असून त्या विभागाकडून प्राप्त होणाऱ्या अभिप्रायानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात दुधभेसळीविरुध्द कार्यवाहीसाठी पुरेशा प्रमाणात वाहने पुरविण्याबाबत**

**(४४) ५१८८७ (२८-०४-२०१६). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दुधभेसळ तपासण्यासाठी केवळ चार तपासणी व्हॅन तर मुंबई शहरासाठी एकच वाहन सद्य:स्थितीत कार्यरत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व राज्यात दुधभेसळीविरुध्द कार्यवाहीसाठी पुरेशा प्रमाणात वाहने पूरविणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२९-०६-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) मोबाईल व्हँनच्या उपयुक्ततेनुसार मोबाईल व्हॅनची संख्या वाढविण्याचा प्रस्ताव अन्न व औषध प्रशासनाकडून मागविण्यात आला असून तो प्राप्त झाल्यावर योग्य ती पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वसई (जि.पालघर) तालुकयातील सार्वजनिक वितरण दक्षता समितीवर अशासकीय सदस्यांच्या नियुक्तीबाबत**

**(४५) ५२०६१ (२८-०४-२०१६). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई (जि.पालघर) तालुक्यात सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत वितरीत होणाऱ्या अन्न धान्य वितरणांमध्ये पारदर्शकता रहावी म्हणून दक्षता समितीची स्थापना व नियमित बैठका होणे गरजेचे असल्याने, वसई तालुक्यातील दक्षता समितीवर शासकीय सदस्यांची नियुक्ती

करण्यात येऊनही अद्यापही या समितीवर अशासकीय सदस्यांची नियुक्ती झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यमान दक्षता समितीच्या सन २०१५ मध्ये एकूण किती बैठका झालेल्या आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त बैठकींमधील चर्चेनुसार वसई मधील धान्य वितरण व्यवस्थेमधील असलेल्या त्रुटी दूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, याप्रकरणी होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०१-०६-२०१६) :** (१), (२) व (३) अंशतः खरे आहे.

तथापि, सद्यस्थितीत शासकीय सदस्यांची नियुक्ती होऊन तालूका दक्षता समितीच्या तीन बैठका झालेल्या आहेत. त्याअनुषंगाने धान्य वितरण व्यवस्थेवर नियंत्रण ठेवून योग्य त्या उपाययोजना करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अन्न व औषधी प्रशासन विभागाने विशेष पथकाची स्थापना करण्याबाबत काढलेला आदेश**

**(४६) ५२३५९ (२८-०४-२०१६). श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अन्न व औषधी प्रशासन विभागाने विशेष पथकाची स्थापना करण्यासंबंधीचा एक आदेश माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निर्गमित केला आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, सदरहू आदेशाचे थोडक्यात स्वरूप काय आहे,

(३) असल्यास, फूड ॲथॉरिटीच्या पूर्व परवानगीने गॅझेटमध्ये अधिसूचनेद्वारे प्रसिध्दी दिल्यानंतरच राज्य शासनाला असे नियम करता येतात, कोणतेही नियम, अधिकार किंवा कर्तव्ये यांच्याविषयी अन्न सुरक्षा मानकांमध्ये स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे असा केंद्रीय कायदा असताना अन्न व औषधी प्रशासन विभागाने विशेष पथकांची स्थापना करण्याबाबतचा आदेश काढण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०८-०६-२०१६) :**(१) दि. ३.१२.२०१५ च्या आदेशान्वये विशेष पथकांची स्थापना करण्यात आली व दि. १५.०३.२०१६ च्या आदेशान्वये विशेष पथकाच्या रचनेमध्ये सुधारणा करण्यात आली आहे.

(२) राज्यातील अन्न सुरक्षा आयुक्तांच्या नियंत्रणाखाली सह आयुक्त (दक्षता), विभागीय स्तरावरील सहायक आयुक्त (अन्न) व अन्न सुरक्षा अधिकारी यांचा समावेश सदर विशेष पथकामध्ये करण्यात आला आहे.

(३) अन्न सुरक्षा व मानदे अधिनियम २००५ व विनिमयन २०११ यांची प्रभावी व परिणामकारक अंमलबजावणी करण्यासाठी प्रशासनास सहाय करण्यासाठी आणि क्षेत्रीय अमंलबजावणी अधिकारी व दक्षता पथक यांच्यामध्ये समन्वय व सुसुत्रता ठेवण्यासाठी सदर पथकामुळे मदत होणार आहे.

---

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाशी संलग्नीत असलेल्या महाविद्यालयांमध्ये प्राचार्य नसल्याबाबत**

**(४७) ५२५९९ (२६-०५-२०१६). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या ४१५ महाविद्यालयांपैकी २३२ महाविद्यालयांमध्ये प्राचार्यच नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्राचार्य नसलेल्या महाविद्यालयांमध्येही पदव्युत्तर अभ्यासक्रमांना मान्यता देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकारामुळे उच्च शिक्षणावर विपरीत परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१४-०७-२०१६) :** (१) होय, तथापि २३२ पैकी २०८ महाविद्यालये ही कायमस्वरुपी विनाअनुदानीत महाविद्यालये आहेत. तसेच अशा नियमित प्राचार्य नसलेल्या महाविद्यालयांमध्ये सेवाजेष्ठ प्राध्यापकाची प्रभारी प्राचार्य म्हणून नियुक्त करण्यात येते.

(२) होय.

(३) विद्यापीठ विद्यापरिषदेच्या निर्णयानुसार किमान दोन पदव्युत्तर प्राध्यापकांची नियुक्ती करण्यात येत असल्याने उच्च शिक्षणावर परिणाम होत नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात अनेक डॉक्टर शासकीय नोकरी सोडून जात असल्याबाबत**

**(४८) ५२६६२ (०३-०५-२०१६). श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनेक डॉक्टर्स शासकीय सेवेत असतांना करार मोडून नोकरी सोडून जात असल्यामुळे बाँडच्या रकमेत वाढ करण्याचा विचार शासन करीत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक डॉक्टर्स शासकीय सेवेचा फायदा घेवून वेतनासोबत शासकीय सवलतीतून पदवीत्तर शिक्षण घेत असून सवलती पूर्ण होताच नोकरी सोडण्याचे प्रकारही करत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्याच्या आरोग्य सेवेतील वैद्यकीय अधिका-यांची रिक्त पदे लक्षात घेवून अशा अर्ध्यावरच नोकरी सोडणाऱ्या डॉक्टर्सना शासकिय सेवा पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच शासकीय सेवेत उच्च शिक्षण घेणाऱ्या वैद्यकिय अधिका-यांच्या रिक्त जागा भरण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१८-०७-२०१६) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) पदवी अभ्यासक्रमाच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांकडून शासकीय सेवा करण्याबाबतचे बंधपत्र लिहून घेण्यात येते. त्यामुळे बंधपत्रानुसार पदवी प्राप्त केल्यानंतर उमेदवाराने शासकीय/स्थानिक स्वराज्य संस्था/संरक्षण दलाची सेवा करणे अनिवार्य आहे. तसेच. शासकीय/महानगरपालिकेच्या वैद्यकीय महाविद्यालयातून पदवी/पदव्युत्तर अतिविशेषोपचार अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या उमेदवारांनी शासनाची करारानुसार बंधपत्रित सेवा केली नाही किंवा बंधपत्रित सेवा अर्धवट सोडून जातात अशा उमेदवारांना कोणतेही मूळ प्रमाणपत्र किंवा अन्य कोणतेही कागदपत्र अथवा ना हरकत देण्यात येवून नयेत अशा सूचना संबंधित अधिष्ठांता यांना देण्यात आलेल्या आहेत. तसेच, उक्त उमदेवारांकडून संबंधित अधिष्ठाता यांच्यामार्फत बंधपत्र वसूलीबाबतची कार्यवाही करण्यात येते.

तसेच, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील कार्यरत असलेल्या अध्यापकांच्या काही रिक्त राहिलेल्या जागा ह्या शासन निर्णय दिनांक १०/०८/२००१ नुसार संबंधित अधिष्ठाता हे विभागीय निवड मंडळामार्फत जाहिरात देवून पदे भरत असतात.

(४) नीट आणि सीइटी या परीक्षेबाबतची भूमिका सध्या न्यायप्रविष्ठ आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सिंधुदूर्ग जिल्हयातील सागरी किनारा क्षेत्रातील सीआरझेड अट शिथिल करणेबाबत.**

**(४९) ५४७८९ (१०-०८-२०१६). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदूर्ग जिल्हयातील सागरी किनारा क्षेत्रातील सीआरझेड अट शिथिल करणेबाबत राज्य शासनाच्या एमसीझेडएमए कमिटीस २२ प्रस्ताव प्राप्त होवूनही अद्याप त्यास मान्यता दिली नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रलंबित प्रस्तावास मान्यता देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली तसेच यापैकी किती प्रस्तावांना राज्य स्तरावर मान्यता दिली व किती प्रस्ताव मान्यतेसाठी केंद्र शासनाकडे कोणत्या दिनांकास पाठविले आहे,

(३) तसेच, केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाकडे पाठविलेल्या प्रस्तावास विनाविलंब मंजूरी मिळावी यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. रामदास कदम (२४-१०-२०१६) :** (१) हे खरे आहे.

(२) सिआरझेड अधिसुचना, २०११ मधिल परिच्छेद क्र. ८.(V).४ नुसार मालवण चा समावेश पर्यावरणीय दृष्टया अतिसंवेदनशील (Critically Vulnerable Coastal Area) (सी.व्ही.सी.ए) या वर्गवारीत समावेश केल्यामुळे परवानगी देता येणे शक्य झाले नाही. त्यामुळे महाराष्ट्र

सागरी किनारा क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणाकडुन वेळोवेळी केंद्रीय पर्यावरण व वने मंत्रालय, भारत सरकार यांचे कडे याबाबत मार्गदर्शक सुचना देण्याबाबत विनंती करण्यात आलेली आहे, तसेच मालवण क्षेत्र हे पर्यावरण दृष्टया अतिसंवेदनशील क्षेत्र (सी.व्ही.सी.ए.) वर्गवारी मधुन सिआरझेड -२ वर्गवारीत समाविष्ट करण्याबाबतही शिफारस करण्यात आली आहे. नुकतेच, महाराष्ट्र सागरी किनारा क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणाकडून सी.व्ही.सी.ए क्षेत्रातील रहिवास बांधकाम / पुर्नबांधकामांचे प्रस्ताव अनुज्ञेय होऊ शकते अगर कसे या बाबत विधी व न्याय विभाग यांचे कडून अभिप्राय घेण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे.

(३) केंद्रीय पर्यावरण व वने मंत्रालय, भारत सरकार यांचे कडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही .

---

**पळासखेडे सिम (ता.पारोळा, जि.जळगांव) येथील पाणी पुरवठा योजना राजकीय वादामुळे प्रलंबित असल्याबाबत**

**(५०) ६०८८८ (१०-०८-२०१६). डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पळासखेडे सिम (ता.पारोळा, जि.जळगांव) या गावास गत ५ वर्षात ८५ लाख रुपये खर्चाच्या योजना मंजुर होऊनही राजकीय वादामुळे गाव पाण्यापासून वंचित आहे तसेच मंगरुळ येथे २० लाख व भोंडण येथे ४८ लाख रुपये खर्च करुनही पाणी मिळत नसल्याचे स्थानिक लोकप्रतिनिधींनी अनेकदा शासनाच्या निदर्शनास आणून दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील योजनांमध्ये शाखा अभियंता बि.जे.पाटील व ठेकेदार यांनी संगनमताने आर्थिक गैरव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पाणी योजनांमध्ये गैरव्यवहार करणा-या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच उक्त गावांना पाणीपुरवठा होण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२५-१०-२०१६) :** (१)अंशत: खरे आहे.

परंतु मंगरूळ व भोंडण येथे पाणी पुरवठा सुरू असून त्याबाबत तक्रारी नाहीत.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) पळासखेडे सिम पाणी पुरवठा योजनेबाबतची चौकशी उपअभियंता, ग्रा.पा.पु. उपविभाग, पाचोरा यांनी केली आहे. या गावासाठी सन २००४-०५ मध्ये बिगर आदिवासी योजनेतंर्गत योजना पूर्ण करण्यात आली. परंतु विहिरीचे पाणी कमी झाल्याने योजना बंद पडली त्यानंतर सन २००६-०७ मध्ये जलस्वराज्य टप्पा १ अंतर्गत दुसरी योजना मंजूर झाली.

सदर योजनेची कामे पूर्ण करून गावास या योजनेदवारा पाणी पुरवठा सुरू होता तथापि विहिरीचे पाणी कमी झाल्याने गावास टंचाई भासत असल्याने सन २०१४-१५ मध्ये राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेतंर्गत योजना मंजूर करण्यात आली असून समितीस जुलै २०१४ मध्ये प्रथम हप्ता वितरीत करण्यात आला आहे. सदर गावच्या ग्रामस्थांनी केलेल्या उदभव बदलून मिळण्याच्या मागणीमुळे वरीष्ठ भूवैज्ञानिक यांनी उदभवाची जागा बदल करून दिलेली असून खोलसर लघु पाटबंधारे ऐवजी लोणी सिम लघु पाटबंधारे येथील बुडीत क्षेत्रामध्ये उदभवाची जागा निश्चित करण्यात आलेली आहे. मात्र सदर बुडीत क्षेत्रात पाणी असल्यामुळे उदभवाचे काम सुरू करता आलेले नाही. तथापि समितीने मार्च २०१७ पर्यत काम पूर्ण करण्याची हमी दिली आहे.

भोंडण व मंगरूळ येथील पाणी पुरवठा योजनांची कामे पूर्ण करून योजनेव्दारे गावास सुरळीत पाणी पुरवठा सुरू आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :** — **डॉ. अनंत कळसे**
**नागपूर.** — **प्रधान सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.